केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देणाऱ्या महाराष्ट्रातील उमेदवारांना प्रत्येक जिल्हास्तरावर अद्ययावत अभ्यासिका उपलब्ध करुन देण्यासाठी निधी वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण १११११/(१९७/१५)/साशि-५,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०३ फेब्रुवारी, २०१६

वाचा:- १. वित्त विभागाचे परिपत्रक क्र.पुरक २०१५/प्र.क्र.२०१/अर्थसंकल्प ३,दि.०१/०१/२०१६
२ . वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ ३, दि.१७/०४/२०१५

प्रस्तावना: -

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत निवड होणाऱ्या अखिल भारतीय सेवामध्ये महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांचे प्रमाण वाढावे याकरिता केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देणाऱ्या महाराष्ट्रातील उमेदवारांना अभ्यासाकरीता सहाय्यभूत म्हणून प्रत्येक जिल्हास्तरावर अद्ययावत अभ्यासिका उपलब्ध करुन देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे.या योजनेसाठी प्रत्येक जिल्हास्तरावर नवीन अभ्यासिका निर्माण करण्याऐवजी प्रत्येक जिल्हास्तरावर उपलब्ध असणाऱ्या ग्रंथालयांचे सक्षमीकरण करण्यासाठी चिन्हांकित झालेला निधी पुरवणी मागणी व्दारे उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय: -

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत निवड होणाऱ्या अखिल भारतीय सेवामध्ये महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांचे प्रमाण वाढावे याकरिता केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देणाऱ्या महाराष्ट्रातील उमेदवारांना अभ्यासाकरीता सहाय्यभूत म्हणून प्रत्येक जिल्हास्तरावर अद्ययावत अभ्यासिका उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता एकुण रु.५.१२ कोटी इतकी रक्कम पुरवणी मागणी व्दारे मंजुर करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र.१ येथील वित्त विभागाच्या परिपत्रकानुसार ५० टक्केच्या मर्यादेत पुरवणी मागण्याचे निधी वितरण विभागाने करावे अशा सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.त्यानुसार प्रत्येक जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी सुसज्ज व अद्ययावत अभ्यासिका स्थापन करण्यासाठी मंजुर करण्यात आलेल्या रु.५.१२ कोटी पैकी ५० टक्के निधी म्हणजेच रु.२.५६ कोटी (रु.दोन कोटी छप्पन्न लाख फक्त) निधी वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. अभ्यासिकेमध्ये स्पर्धा परिक्षाविषयक ग्रंथसंपदा,नियतकालिके, संगणक,प्रिंटर आणि ईनव्हर्टर उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह,फर्निचर, विजेची उपलब्धता इत्यादी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.अभ्यासिकेमध्ये स्थानिक मार्गदर्शक व बाहेरील अतिथी मार्गदर्शक यांचा लाभ विदयार्थ्यांकरिता उपलब्ध करुन देण्यात यावा.

३. वरील खर्च वित्त विभागाच्या संदर्भाधीन दिनांक १७/०४/२०१५ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार करण्यात यावा. यासाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांना आहंरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. हा निधी मागणी क्रमांक "डब्ल्यू-४, २२०५-कला व संस्कृती, १०५, सार्वजनिक ग्रंथालये, (०२) (०२) शासकीय मध्यवर्ती विभागीय व जिल्हा व ग्रंथालये ,(२२०५ ०२८९) (योजना अंतर्गत)" या लेखाशिर्षाखाली

चालु वर्ष २०१५-१६ करीता उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा. तसेच या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

५. प्रत्येक जिल्हयातील शासकीय जिल्हा ग्रंथालयामध्ये सुसज्ज व अद्ययावत अभ्यासिका स्थापन करण्यात यावी. ज्या जिल्हाच्या ठिकाणी अभ्यासिकेसाठी शासनाची स्वत:ची जागा उपलब्ध नाही तेथे भाडेतत्वानुसार जागा उपलब्ध करुन घेण्यात यावी.

६. केंद्र व राज्य शासनाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी अभ्यासिका कक्ष उपलब्ध करुन देण्यात यावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्र. पुरक २०१५/प्र.क्र.२०१/अर्थसंकल्प ३,दि.०१/०१/२०१६ नुसार मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय शासनाचे www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१६०२०४११५०२१२६०८ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Paraji Malikarjun Takate

Digitally signed by Paraji Malikarjun Takate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Paraji Malikarjun Takate
Date: 2016.02.04 11:50:26 +05'30'

(पा.म.ताकटे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
३. मा. वित्तमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
५. मा. प्रधान सचिव (उवतंशि) यांचे स्वीय सहाय्यक
६. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर
७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
८. सर्व अधिदान व लेखा अधिकारी
९. सर्व निवासी लेखापरीक्षा अधिकारी,
१०. ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. सर्व विभागीय सहाय्यक ग्रंथालय संचालक
१२. सर्व शासकीय जिल्हा ग्रंथालय अधिकारी
१३. ग्रंथपाल, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय , मुंबई
१४. निवडनस्ती (साशि-५)